चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२७ जानेवारी, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# रेकॉर्डवरील गुन्हेगारांविरुध्द कोबिंग ऑपरेशन

- रेकॉर्डवरील गुन्हेगार यांना चेक करुन ६२ गुन्हेगारांविरुध्द प्रतिबंधक कार्यवाही

रामनगर पोलीस स्टेशन अतंर्गत आज दिनांक १६/०२/२०१९ रोजी रेकॉर्डवरील दारुविक्रीचे गुन्हेगारांविरुध्द एकाचवेळी वेगळयावेगळया पथकांद्वारे चंद्रपुर शहरातील रयतवारी, नेहरुनगर, खंजर मोहल्ला, बंगाली कॅम्प, बगळखिडकी या भागामध्ये पोलीसांनी आज सकाळीच कोबिंग ऑपरेशन राबविले.

सदर मोहिमेकरीता पोलीस मुख्यालय चंद्रपुर, रामनगर व चंद्रपुर शहर पोलीस स्टेशन येथील एकुण १० अधिकारी व १०० पोलीस कर्मचारी यांचा सहभाग होता. सर्वांना पहाटे ०६ वाजता पोलीस मुख्यालय येथे बोलविण्यात आले. व त्यांना या मोहिमेत करावयाच्या कार्यवाहीविषयी माहिती देउन सुचना देण्यात आल्या. प्रत्येक भागासाठी १ अधिकारी ३ पुरूष कर्मचारी व २ महिला कर्मचारी अशी टिम तयार करण्यात आल्या. नियोजनाप्रमाणे आरोपींच्या घरी जावुन त्यांना चेक करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली. तयार केलेल्या सर्व टिमद्वारे एकुण ६२ रेकॉर्डवरील गुन्हेगारांना चेक करण्यात आले. व त्यांचेविरुध्द ११० सिआरपीसी व कलम ९३ महाराष्ट्र दारुबंदी कायदा प्रमाणे २७ लोकांविरुध्द प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली. एकुण ७ आरोपींना सिआरपीसी कलम १४९ प्रमाणे नोटीस देण्यात आल्या. इतर आरोपीविरूध्द काही दिवसापुर्वीच प्रतिबंधक कार्यवाही केलेली असल्याने त्यांना सुचना प्रत्र देण्यात आले.

सदरची कार्यवाही श्री. महेश्वर रेडड्ी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. हेमराजसिंह राजपूत अपर पोलीस अधीक्षक यांचे नेतृत्वात, परिविक्षाधिन आयपीएस अधिकारी श्री. नवनित कांवत, परिविक्षाधिन पोलीस उपअधीक्षक श्री. अमोल मांडवे यांचे प्रमुख उपस्थितीत, पोनि कोळी, पोनि भगत, सपोनि दरेकर, पोउपनि कापडे, वाघमारे यांचे सह पोस्टे चंद्रपुर शहर, रामनगर आणि पोलीस मुख्यालय येथील कर्मचारी यांनी पार पाडली.

---